# महाराष्ट्र परावैद्यक परिषद

शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय इमारत चौथा मजला,सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार,
पी.डीमेलो रोड,फोर्ट,मुंबई -४०० ००१दुरध्वनी क्र.९१-२२-२२६२०३६०
ई-मेल आयडी -mpmcmumbai2017@gmail.com
वेबसाईट -**www.maharashtraparamedicalcouncil.org**


---

दिनांक ०४.०३.२०२०

प्रति,

-----------------------------------------------------------

-----------------------------------------------------------

राज्यात "महाराष्ट्र परावैद्यक परिषद अधिनियम २०११" (Maharashtra Paramedical Council Act २०१६) दिनांक १ जुलै, २०१७ लागू होऊन महाराष्ट्र परावैद्यक परिषद (MPC) गठित करण्यात आली आहे.

कायद्यातील सेक्शन २६(१) व (२) नुसार शासनमान्य परावैद्यकिय शैक्षणिक अर्हता (Government Recognise Paramedical Qualification) धारण करून ज्या व्यक्ती स्वतंत्ररीत्या किंवा शासकिय निमशासकीय खाजगी रुग्णालये किंवा वैद्यकीय प्रयोगशाळा अथवा आरोग्याशी निगडित प्रतिष्ठानां मध्ये " परावैद्यक तंत्रज्ञ" म्हणुन कार्यरत आहेत, त्यांना नोंदणी करणे बंधनकारक आहे.

महाराष्ट्र परावैद्यक परिषदेच्या www.maharashtraparamedicalcouncil.org या संकेतस्थळावर परिषदेचे अधिनियम, नियम, परिषदेने घेतलेले ठराव, रजिस्ट्रेशन व्हेरिफिकेशन व रजिस्ट्रेशन बाबतची संपूर्ण माहिती उपलब्ध आहे.

अधिनियमाच्या मुळ अनुसूची क्र. १ ते २२ व सुधारित अनुसूची क्र. MPC/०७१९/C.R. १६४ Act, १३ नोव्हेंबर,२०१९ मधिल शैक्षणिक अर्हता आवश्यक आहे, असे आरोग्य विज्ञान विद्यापीठ, विद्यापीठ अनुदान आयोग, राज्य शासन मान्यताप्राप्त विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ मुंबई (MSBTE), परावैद्यक विषय घेऊन उच्च माध्यमिक शैक्षणिक प्रमाण पत्र मधील MCVC अभ्यासक्रम (MCVC साठी मानव संसाधन विकास मंत्रालय यांचे व्यावसायिक प्रशिक्षण पूर्ण करून प्रमाणपत्र मिळुन तीन वर्षांचा अभ्यासक्रम आवश्यक) घेतलेले असावेत.

वरिल प्रमाणे अहर्ता धारकांनी महाराष्ट्र परावैद्यक परिषदेकडे रजिस्ट्रेशन बाबतची अनिवार्य कागदपत्रे व व्हेरिफिकेशन शुल्क रु २०००/- ३१ मे २०२० पर्यंत व व्हेरिफिकेशन होउन ई-मेल द्वारा कळवण्यात आल्या नंतर रजिस्ट्रेशन शुल्क रु ५,०००/- भरुन तात्काळ नोंदणी करणे बंधनकारक आहे. ही नोंदणी अधिनियमातील कलम २६(२) तरतुदी प्रमाणे परिषदेतर्फे करण्यात येईल.

वरिल प्रमाणे शैक्षणिक अर्हता नसलेल्या व परावैद्यक परिषदेची नोंदणी नसणाऱ्या व्यक्ती, महाराष्ट्र परावैद्यक परिषद (MMC) नोंदणी कृत मेडिकल प्रेक्टिशनर, शरिरविकृती शास्त्रातील पोस्ट ग्रेज्युएट डॉक्टर ( MD, DCP) यांच्या सहिचा वापर करून" परावैद्यक तंत्रज्ञ म्हणुन व्यवसाय करतात वा त्यांच्या वैद्यकीय आस्थापनांमध्ये कर्यरत आहेत, अशा व्यक्ती या अधिनियमान्वये अधिकृत राहाणार नाही असे अनधिकृत परावैद्यक व्यावसायिक व्यक्ती ज्यांची महाराष्ट्र परावैद्यक परिषदेतर्फे नोंदणी केली गेलेली नसेल, त्यांना कायद्याच्या कलम ३१ (१) (२) व ३२ प्रमाणे कारवाईस सामोरे जावे लागेल व ते शिक्षेस पात्र ठरतिल, याची नोंद घ्यावी.

| | | |
|---|---|---|
| श्री धनंजय कुलकर्णी<br>अध्यक्ष | श्री उमेश सोनार<br>उपाध्यक्ष | श्रीमती दिशा गुडूळकर<br>प्रबंधक<br>महाराष्ट्र परावैद्यक परिषद मुंबई |